सकाळ » TODAY बारामती विभाग

पुणे जिल्हा

पुणे, गुरुवार, १० जून २०२१ ३

## बारामतीत विद्यार्थ्यांकडून रुग्णांना फळांचे वाटप

बारामती : विद्या प्रतिष्ठान स्कूल ऑफ आर्किटेक्चरमधील विद्यार्थ्यांनी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सामाजिक बांधिलकीच्या दृष्टिकोनातून रुई ग्रामीण रुग्णालयात रुग्ण व नातेवाइकांना अल्पोपाहार व फळांचे वाटप केले. रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. सुनील दराडे, रुग्णालयातील इतर डॉक्टर्स, परिचारिका तसेच महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी या प्रसंगी उपस्थित होते. विद्या प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष ॲड. अशोक प्रभुणे, सचिव ॲड. नीलिमा गुजर, महाविद्यालयाच्या प्राचार्या राजश्री पाटील यांनी मार्गदर्शन केले. नथू ठोंबरे आणि विद्यार्थ्यांनी कार्यक्रम आयोजित केला होता.

**विद्या प्रतिष्ठानचे स्कूल ऑफ आर्किटेक्चर, बारामती या महाविद्यालयामार्फत रुई ग्रामीण रुग्णालयामध्ये सामाजिक उपक्रम**

विद्या प्रतिष्ठानचे स्कूल ऑफ आर्किटेक्चर, बारामती मधील विद्यार्थ्यांनी कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर सामाजिक बांधिलकीच्या दृष्टीकोनातून सोमवार, दिनांक ७ जून २०२१ रोजी ग्रामीण रुग्णालय रुई, बारामती येथील रुग्णांना फळ आणि अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले.

या प्रसंगी रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुनिल दराडे, रुग्णालयातील इतर डॉक्टर्स, परिचारिका तसेच महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थितीमध्ये फळ वाटप कार्यक्रम पार पडला.

सदर सामाजिक उपक्रमाच्या आयोजनासाठी विद्या प्रतिष्ठान संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. अशोक प्रभुणे, सचिव ॲड. नीलिमा गुजर आणि इतर सर्व व्यवस्थापकीय सदस्य तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्या सौ. राजश्री पाटील यांनी मार्गदर्शन केले. सहाय्यक प्राध्यापक श्री. नथू ठोंबरे आणि विद्यार्थ्यांचे मोलाचे योगदान लाभले.



रुग्णालयामध्ये फळ आणि अल्पोपहार सुपूर्द करताना

प्र-प्राचार्य
विद्या प्रतिष्ठानचे
स्कुल ऑफ आर्किटेक्चर, बारामती
विद्यानगरी,बारामती जि.पुणे ४१३१३३